# संशोधनात नावीन्याची दृष्टी आवश्यक

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

नवसंशोधकांना संशोधनाची अनेक क्षेत्रे खुली आहेत. जाहिरातीपासून नोटाबंदीपर्यंतच्या घटनांचा समाजजीवनावर होणारा परिणाम विषयावर संशोधन शक्य असल्याचे प्रतिपादन ताराराणी विद्यापीठाचे सचिव डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये संशोधनासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते.

**डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे प्रतिपादन**

डॉ. पाटील म्हणाले, 'नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यांच्या संशोधनात फरक आहे. शास्त्रीय संशोधने तंतोतत असतात. सामाजिक संशोधनाला मर्यादा येतात. त्यांचा विचार करून संशोधन करण्याची गरज आहे. संशोधन समाजाभिमुख असून नाविन्याची दृष्टी असावी.'

विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे म्हणाले, 'संशोधनासाठी संकलित केली जाणारी तथ्ये महत्वाची आहेत. प्राथमिक तथ्यातून संशोधन समस्याची उकल शास्त्रशुद्ध होते. संकलनासाठी प्रश्नावली समस्याचा शोध घेणारी कमी खर्चाची आणि सोप्या भाषेतील असावी. यासह यांत्रिक शोध साधने, प्रक्षेपण तंत्र, संदर्भ, ग्रंथ, जर्नल्स, वार्षिक अहवाल, तज्ज्ञांचे अभिप्राय महत्वाचे ठरतात.'

डॉ. अरूण बसुगडे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. एस. एन. पवार, प्राचार्य जे. बी. पाटील, डॉ. अनघा पाठक, डॉ. नेताजी पोवार, प्रा. एन. एस. शिरोळकर, डॉ. सुजय पाटील, प्रा. अनिल घस्ते, डॉ. टी. एस. थोरात यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला.

Scanned by CamScanner